प्रिय मातेस इस्लामी संदेश

लेखक
नसीम गाजी

अनुवाद
डॉ. एम. यू. कहाळे

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

दोन शब्द

हे पत्र आजपासून जवळपास १० वर्षांपूर्वी लिहिले होते. त्या वेळी मी जामिअतुल-फलाह बिलरिया गंज आजमगढ (उत्तर प्रदेश) मध्ये धार्मिक शिक्षण घेत होतो. अधूनमधून मी गाजीयाबाद येथील माझ्या घरी येत असे. इस्लाम स्वीकारण्यापूर्वी माझा संबंध हिंदू समाजातील अग्रवाल वंशाशी होता. माझे वय ९ वर्षे असताना माझ्या वडिलांचे निधन झाले होते. मला या गोष्टीची मुळीच कल्पना नव्हती की एक दिवस मला इस्लाम स्वीकारण्याचे सौभाग्य प्राप्त होईल. माझे संगोपक माझे आदरणीय मोठे भाऊ होते, परंतु इस्लामविषयी त्यांचे विचार माझ्या विचारांशी संमत होते. यामुळे त्यांचा विरोध झाला नाही, उलट त्यांचे सहकार्य व संरक्षण नेहमी प्राप्त राहिले. परंतु मातोश्री याच्या विपरीत होत्या. त्यांना माझे इस्लाम स्वीकारणे असह्य होते. त्यांना यापेक्षा जास्त असहनीय गोष्ट ही होती की मी त्यांच्यापासून वेगळा होऊन आजमगढमध्ये धार्मिक शिक्षण ग्रहण करण्यास गेलो. वास्तविक मी मध्यंतरी घरी येत असे. हे अगदी स्वाभाविक होते की माझ्या आईनेही सत्य धर्मात प्रवेश करावा अशी माझी प्रबळ इच्छा होती. तर आई व्याकुळ होती की मी किती लवकर इस्लामचा त्याग करुन पुन्हा जुन्या धर्मात येतो. कारण आईचे माझ्याप्रति असलेल्या अगाढ प्रेमामुळे माझ्या या कृत्याने त्यांना मानसिकदृष्ट्या विचलित केले होते. त्यांची ही व्यथा अगदी स्वाभाविक होती. कारण इस्लामच्या यथार्थ शिकवणींचे त्यांना ज्ञान नव्हते आणि मुस्लिम आपल्या आचरणाने जे चित्र प्रकाशित करीत होते ते सर्वथा इस्लामी शिकवणींच्या विपरीत आणि संदेहात्मक होते, म्हणूनच इस्लामविषयी त्यांच्या मनात कठोरता व्याप्त होती. माझ्याप्रति त्यांच्या मनात नाना प्रकारचे विचार येत असत तर कधी दुसऱ्याद्वारे निर्माण करण्यात येत असत. प्रस्तुत पत्राने याची सत्यता समोर येते. त्यांच्या मनातील शंका-कुशंकांच्या वादळाला दूर करण्याचा आणि इस्लामच्या वास्तविक शिकवणीला प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करीत होतो. कधी चर्चेद्वारे तर कधी पत्राच्या माध्यमातून हा प्रयत्न मी करत होतो.

माझ्या जन्मानंत्तर हिंदू रीतीनुसार आमच्या वांशिक पंडितांनी माझ्या हस्तरेषा आणि जन्मपत्रिका इत्यादी बघून माझ्या भविष्याविषयी अन्य कथनासोबत हेसुद्धा

सांगितले की तुमचा हा मुलगा मोठा झाल्यावर तुमचा राहणार नाही. आपल्या क्रांतिकारी उपकर्मामुळे तो शहरात प्रसिद्ध होईल. जनसामान्यांसाठी तो एक प्रश्नचिन्ह बनून राहील. माझ्या इस्लाम स्वीकारण्याने आईला पंडितजींची ही भविष्यवाणी पूर्ण होत असल्याचा आभास होऊ लागला. त्यांनी मला या भविष्यवाणीची आठवण करुन देत माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. माझ्या आईचा हा समज होता की इस्लाममध्ये तर काही विशेषता नाही, माझा मुलगा तर मौलाना हामिद अली साहेबांच्या बहकविण्यात आला आहे. या पत्राद्वारे मी त्यांचा हा भ्रम दूर करण्याच्या प्रयत्नासोबत इस्लामकडे आमंत्रित केले होते. यापासून माझा उद्देश केवळ माझी व इस्लामची सुरक्षाच नव्हती तर माझी मनोकामना आणि प्रयत्न हाच होता की माझी आई इस्लामसारख्या अप्रतिम आणि अलभ्य वस्तूपासून वंचित राहू नये.

या पत्राच्या अध्ययनानंतर त्यांच्या विरोधात सौम्यता तर आली, परंतु त्या आपला पैतृक धर्म सोडायला तयार झाल्या नाही. मी मात्र सतत त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होतो आणि अल्लाहशी प्रार्थनाही. जवळपास तीन वर्षांच्या परिश्रमानंतर ईशकृपेने त्यांनी सत्य धर्माचा हृदयापासून स्वीकार केला आणि आपल्या भूतकाळातील अज्ञानी जीवनाप्रति प्रभुशी क्षमा-याचना केली.

अल्लाहचे कोट्यवधी अभिनंदन आणि आभार की आज माझी आदरणीय माता इस्लामवर तठस्थ आहे. आज त्या पूर्णपणे संतुष्ट व आनंदी आहेत. त्यांनी आतापर्यंत तीन वेळा पवित्र कुरआनच्या हिंदी भाषांतराचे पूर्ण अध्ययन केले आहे, हा त्यांच्या हार्दिक प्रेमाचाच पुरावा आहे.

या सुखद घटनेने दुसऱ्या लोकांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हे व्यक्तिगत पत्र प्रकाशित करण्यात येत आहे. प्रभुशी माझी प्रार्थना आहे की हे पत्र मार्गभ्रष्ट आत्म्यांना सहाय्यक बनावे. तसेच जीवनाप्रति गंभीर निर्णय घेण्यास त्यांना साहस व हिंमत प्राप्त होवो.

नसीम गाजी

फेब्रुवारी, १९८१

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रिय मातेस

आदाब,

ईशकृपेने आपण कुशल मंगल असाल. बऱ्याच दिवसांपूर्वी आपले प्रेमाने भारावलेले पत्र प्राप्त झाले होते. काही अपरिहार्य विवशतेमुळे उत्तर देण्यास विलंब झाला यासाठी आपण क्षमा करावी.

माझी प्रिय माता! ज्याप्रमाणे आपले मन माझ्या आठवणीने व्याकुळ होते, त्याचप्रमाणे माझे हृदयसुद्धा आपली ममता आणि प्रेमाच्या स्मरणाने विव्हळते आणि असे वाटते जणू काही तप्त तव्यावर एखादा दाणा! प्रिय आई, मला असे वाटते की पक्ष्याप्रमाणे उडून आपल्याजवळ पोहचावे. परंतु दीनी (जीवन व्यतीत करण्याचे धार्मिक) शिक्षणप्राप्तीचे कर्तव्य मला रोखत आहे. हे माते! मला दीनी शिक्षण प्राप्त करणे इतके आवश्यक आणि महत्त्वपूर्ण आहे की यासाठी मी आपल्यापासून वेगळे होणेही मान्य केले. परंतु हे आई! मला तुमची आठवण सतत येते आणि तुमच्याचविषयी मी सदैव विचार करीत असतो. तुमच्याप्रति सतत काळजी होणे अगदी स्वाभाविकच! कारण आपले माझ्यावर इतके उपकार आहेत की त्यांची अभिव्यक्तीही अशक्य आहे आणि मोबदलाही असंभव आहे.

माझी प्रिय आई! आपले ते शब्द जे वेळोवेळी आपल्या मुखाने निघत होते की, "माझा मुलगा माझ्या हातातून निघून गेला.", "मौलानांनी माझ्या लाडक्या लेकाला बहकविले." "पंडितजींनी अगदी सत्यच सांगितले होते की तुमचा मुलगा तुमचा राहणार नाही तर तो दुसऱ्यांचा होईल." तुमचे हेच शब्द मला सतत भेडसावित असतात. मला या गोष्टीची सतत काळजी असते की आपणास माझ्याविषयी हा संभ्रम का बरे निर्माण झाला? आपण माझे असे कोणते अशोभनीय कृत्य बघितले ज्यामुळे आपण माझ्याप्रति इतक्या चिंतित झाल्यात?

हे अतिप्रिय माते! आपल्या मनात या शंका केवळ यामुळेच निर्माण झाल्यात ना की मी अल्लाहला (ईश्वराला) आपला स्वामी व पालनकर्ता बनविले आणि त्याच्या संदेशवाहकावर श्रद्धा बाळगतो. आई! मी हा निर्णय केला आहे की आपल्या पूर्ण जीवनात ईशआदेशाचे पालन करणार. प्रत्येक कार्य त्याच्या आदेशानुसारच करणार आणि ईशत्वात दुसऱ्या कोणालाही संमिलित करणार नाही. मी अल्लाहला आपला पूज्य (पूजनीय) उपास्य, स्वामी, शासक व पालनकर्ता समजतो आणि या गोष्टीवर विश्वास बाळगतो की त्याने (अल्लाहने) निर्माण केले आहे आणि जीवन व्यतीत करण्यास आवश्यक सर्व साधने उपलब्ध केली आहेत. अन्न, पाणी आणि वस्त्र इत्यादी वस्तूंचा बंदोबस्त केला आहे. मृत्यूपश्चात एक दिवस असा येणार आहे ज्या दिवशी अल्लाह या जगात आम्ही जे कर्म केलेत त्यांचा हिशेब घेईन आणि जगात त्याच्या निर्धारित नियमांवर आचरण करणाऱ्या लोकांना स्वर्गात स्थान देईल आणि ज्या लोकांनी त्याच्या नियमांची किंवा आदेशांची अवहेलना केली असेल त्यांना नरकात टाकेल. हे माझ्या प्रिय माते! स्वत:ला नरकाग्नीपासून सुरक्षित ठेवण्यास आणि स्वर्गात प्रवेश प्राप्त करण्यास ईशनियमांचे पालन करण्याचा ठाम निर्णय घेतला, हाच काय तो माझा अवगुण होय! अर्थात त्या ईशनियमांचे पालन करण्याचा ठाम निर्णय घेतला. जे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याद्वारे अल्लाहने मानवासाठी पाठविले आहे. हे माते, मी ते सर्व कार्य (कर्म) करेन ज्यांना करण्याचा अल्लाहने आदेश दिला आणि त्या कृत्यांपासून स्वत:ला अलिप्त ठेवणार ज्यांना न करण्याचा त्याने आदेश दिला आहे. दुसऱ्या शब्दांत मी मुस्लिम बनून जीवन व्यतीत करेन, कारण मुस्लिम म्हणतातच त्या व्यक्तीला जो ईशआदेशांचे पालन करतो. हे माते! यामुळेच तर मी ती सर्व वाईट कृत्ये सोडून दिलीत ज्यांना न करण्याचा आदेश अल्लाहने दिला. हे आई! आपणास माहीत आहे की मुस्लिम होण्यापूर्वी चोरी करणे, खोटे बोलणे, सिनेमा बघणे इत्यादी सर्व अवगुण मुस्लिम झाल्यावर सुटले, कारण अल्लाहने त्यांना करण्यापासून सक्तीने रोखले आहे आणि ईशआदेशाची अवहेलना करण्याचे धाडस मी कसे करणार?

प्रिय आई! मी ज्या धार्मिक श्रद्धेवर विश्वास बाळगतो त्याला अल्लाहने संपूर्ण मानवजातीसाठी पाठविले आहे. हा धर्म जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राविषयी आदेश देतो किंवा मार्गदर्शन करतो. यासाठीच तर तो सांगतो की आम्ही पूजा-पाठ कशाप्रकारे करावे,

आमचे आपापसांतील संबध कशा प्रकारे असावेत, आम्ही राजनीतीमध्ये कसा भाग घ्यावा, राज्यकारभार कसा करावा, आपसांतील भेटीगाठी कशा असाव्यात आणि लोकांशी भेटी घेताना कसा शिष्टाचार असावा, खाणे-पिणे, पांघरुण, वस्त्र-परिधान, झोपणे, जागणे, चालणे-फिरणे, गप्प राहणे आणि बोलणे, लग्न-सोहळा, परस्पर संबध इत्यादी. तात्पर्य, मानवास त्याच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्पष्ट मार्गदर्शन व नियम सांगितले. अल्लाहने अगदी स्पष्ट सांगितले की आम्ही आपले आई-बाबा, भाऊ-बहीण, पती-पत्नी, शेजारी, मित्र, शत्रू, आपला व परका यांच्याशी कसा व्यवहार करावा. मी हा ठाम निर्धार केला आहे की मी ईशनिर्देशित मार्गावरच चालेन आणि त्याने सांगितल्याप्रमाणेच आचरण करेन. तेव्हा आई-बाबांविषयी त्याचे आदेश जाणून घेणेही आवश्यक होय. त्याचसोबत माझे आचरण तसेच असावे जसे अल्लाहला अपेक्षित आहे. प्रिय आई! मी आपल्या समक्ष स्पष्ट करु इच्छितो की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आईवडिलांशी कसा व्यवहार करावा यासाठी कोणते आदेश दिलेत.

अल्लाहने आपल्या पवित्र ग्रंथ कुरआनात अनेक जागी हा आदेश दिला आहे की आईवडिलांशी सद्व्यवहार अर्थात चांगला व्यवहार करा. अतिशय उत्कृष्ट पद्धतीची वागणूक आईवडिलांसोबत असावी. त्यांना त्रास देऊ नका. त्यांचे आज्ञापालन करा आणि त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करा. असाच आदेश ईशदूत मुहम्मद (स.) यांनी मुस्लिमांना दिला. एका प्रसंगी एका व्यक्तीने पैगंबर मुहम्मद (स.) यांना विचारले, "अल्लाहला कोणते कार्य सर्वांत जास्त प्रिय आहे?" पैगंबर म्हणाले, "ती नमाज जी आपल्या निर्धारित वेळेवर अदा केली जाते." त्याने विचारले, "यानंतर कोणते कर्म?" पैगंबरांनी सांगितले, "आईवडिलांसोबत चांगला व्यवहार करणे." अशाच प्रकारे एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याजवळ एक व्यक्ती आला आणि म्हणाला, "मी जिहाद (ईशमार्गात प्राणाची आहुती देणे) साठी आपल्या हातावर वचनबद्ध होत आहे आणि हे कर्म मी पुण्यकर्म म्हणून करीत आहे." पैगंबरांनी विचारले, "तुमच्या आईवडिलांपैकी कुणी जिवंत आहे काय?" तो व्यक्ती म्हणाला, "होय. ईशकृपेने दोघेही हयात आहेत." पैगंबरांनी त्याला आईवडिलांची सेवा करण्यास परत पाठवित सांगितले, "तुमचा जिहाद हाच आहे." एका प्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले,

"आई-वडीलच तुमचा स्वर्ग आणि नरक आहे. जर तुम्ही आपल्या आईवडिलांचे आज्ञापालन कराल, त्यांची सेवा सुश्रृषा कराल, त्यांच्याशी सद्व्यवहार कराल, नम्रतेने त्यांच्या समक्ष उभे राहाल आणि त्यांचे कृतज्ञ व आभारी असाल तर स्वर्गात प्रवेश कराल. परंतु जर तुमची वागणूक याच्या विपरीत असेल अर्थात तुम्ही त्यांना त्रास दिला, त्यांची अवज्ञा केली, त्यांचे ऐकले नाही, त्यांच्याशी दुर्व्यवहार केला किंवा वाईट बोललात तर नरकाच्या भडकत्या आगीत दाखल केले जाल." अशाच प्रकारे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विभिन्न समयी आईवडिलांसोबत सद्व्यवहार करण्यास लोकांना प्रेरित केले.

अल्लाह पवित्र कुरआनमध्ये फर्मावितो, "जर आई-वडील यांच्यापैकी कोणी एक किंवा दोन्ही तुमच्या समक्ष वृद्धावस्थेत आलेत तर त्यांना कोणतीही अप्रिय गोष्ट सांगू नका आणि त्यांना धुडकावू नका. (किंवा तिरस्काराने किंवा झटकून बोलू नका.) अर्थात त्यांना मारणे, वाईट बोलणे, कष्ट देणे तर सोडाच त्यांना वाईट वाटेल अशा गोष्टीही बोलू नका. या विपरीत जर ते अशी गोष्ट सांगत असतील जी तुम्हाला पसंत नाही, तर तुम्ही संयम बाळगा आणि सहन करा, परंतु त्यांना झिडकारू नका. त्यांना प्रत्येक क्षणी आनंदी व प्रसन्न ठेवा आणि दुःखी व नाराज करू नका." अशाच प्रकारे अनेक जागी आईची सेवा करण्याचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

आई-वडील यांच्यापैकी एक किंवा दोन्ही मृत्यू पावले तरी अल्लाह आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हा आदेश आहे की त्यांच्यासाठी अल्लाहसमक्ष प्रार्थना करा की, "हे प्रभु! तू त्यांना क्षमा कर, त्यांना सुखा-समाधानात ठेव आणि स्वर्गात दाखल कर!"

अल्लाहने निःसंशय आईवडिलांशी चांगली वर्तणूक आणि सेवा करण्याची तसेच त्यांचे आज्ञापालन करण्याची आणि आराम पोहचविण्याची ताकीद केली आहे, परंतु त्याचसोबत हेसुद्धा स्पष्ट केले की अल्लाहने निषिद्ध केलेल्या कोणत्याही कृत्याची आज्ञा आई-वडील जर देत असतील तर त्यांच्या अशा आज्ञांचे खंडण करावे, त्यांची अशी आज्ञा मान्य करु नये, हा नियम अगदी सत्य आहे. आई-वडील चुकीची आज्ञा देतील तर ती कसे बरे मान्य केली जाईल. परंतु सत्य आणि योग्य आज्ञेचे पूर्णपणे पालन केले जाईल. आदरणीय आई! मी पूर्वीच ही गोष्ट स्पष्ट केली आहे की अल्लाहने

आणि त्याच्या पैगंबरांनी दिलेल्या आदेशाचेच मी पालन करेन, ज्याचा आदेश अल्लाह व पैगंबरांनी दिला आहे. हे आई! आईवडिलांविषयी अल्लाह व त्याच्या पैगंबरांचा काय आदेश आहे व कोणती शिकवण आहे हे मी आपल्या समक्ष प्रस्तुत केली आहे. मी प्रयत्न करेन की माझे आचरण त्या शिकवणीनुसारच होवो. आई! मला पूर्ण विश्वास आहे की आपण काळजीपूर्वक या शिकवणींचे अध्ययन कराल आणि त्यावर चिंतन मनन कराल आणि जेव्हा तुम्हाला कळेल की माझा मुलगा खरे बोलतो आहे तेव्हा तुमचे अंतर्मन आवर्जून साक्ष देईल की, हो! नक्कीच माझ्या मनातील कल्पना, शंका-कुशंका चुकीच्या आहेत की माझ्या मुलाला मौलानांनी बहकविले. आता तो माझा राहिला नाही. उलट तुम्ही साक्ष द्याल की मौलानांनी तर त्याला माझा मुलगा बनविले आणि कधीही वेगळा न होणारा हृदयाचे अंग बनविले. त्याला बहकविले नाही तर सत्यमार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले. पंडितजींचे म्हणणे सर्वथा निराधार आणि चुकीचे आहे की तुमचा मुलगा भविष्यात तुमचा राहणार नाही.

प्रिय आई! विश्वास बाळग! मी तुझाच आहे आणि तुझाच राहीन. हे आई! मनात बिंबविलेल्या किंवा निर्माण झालेल्या शंका-कुशंकाना तू काढून फेक!

हे आई! मी पूर्वीच तुला म्हटले होते की मानवजातीस सन्मार्ग दाखविणारा हा धर्म अल्लाहकडून अवतरित आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राविषयी तो सत्य मार्गदर्शन करतो. कोणत्याही धर्माच्या सत्यतेविषयी आणि असत्येविषयी निर्णय घेण्यास त्याच्या कोणत्याही एका क्षेत्रातील शिकवणीची परीक्षा घेणे पुरेसे होईल. इस्लामचे माता-पित्यासंबंधीचे आदेश आपल्या समक्ष आहेत. या शिकवणीवर विचार करुन तुम्ही चांगल्या प्रकारे समजू शकता की इस्लाम कसा धर्म आहे. इतके प्रबळ आणि योग्य आदेश अन्य कोणत्याही धर्मात दिले गेले आहेत काय? आशा आहे आपण या निष्कर्षापर्यंत निश्चित पोहचाल की अशा प्रकारच्या शिकवणी अन्य कोणत्याही धर्मात नाहीत. तेव्हा हे आई! हे समजून घे की जीवनाच्या अन्य क्षेत्रातही अशीच शिकवण व असेच आदेश देऊन मानवाचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

माझ्या प्रिय माते! आपण माझे संगोपन, पालनपोषण करण्यास किती कष्ट घेतले, किती त्रास सोसला याची जाणीव मला आहे. आपण माझ्यासाठी कष्ट घेतले. मला कित्येक महिने पोटात घेऊन फिरलात, त्या समयी होणारा त्रास सहन केला आणि

जेव्हा मी जमिनीवर पाय ठेवले तेव्हा होणाऱ्या त्रासदायक कळा आपण सहन केल्या. मी एक विवश, लाचार मांसाचा गोळा होतो. परंतु आपण या मांसाच्या तुकड्याचे पालनपोषण मन लावून प्रसन्नचित्ताने केले. मी थोडा मोठा झालो की माझ्या शिक्षणाचा प्रबंध केला. माझ्या सुधारासाठी व प्रगतीसाठी तुम्ही सतत चिंतीत असत. मी आजारी पडलो म्हणजे तुम्ही अस्वस्थ होत असत. माझ्यासाठी तुम्ही आपल्या सर्व सुख-सोयींचा त्याग केला, काय दिवस आणि काय रात्र. मला चांगल्यात चांगले खाऊ घातले आणि अनेक प्रसंगी माझ्यासाठी उपाशी राहिला. स्वत: जाडे-भरडे नेसून माझ्यासाठी उत्कृष्ट वस्त्रांचा बंदोबस्त केला. वास्तविकता ही आहे की आपल्या उपकारांना शब्दाने व्यक्त करणे शक्यच नाही. आपल्या या उपकारांचा मोबदला तर दूरची गोष्ट त्याच्या धन्यवादाचा हक्कही अदा करणे अशक्य आहे. या महानतेमुळेच तर अल्लाहने आईसोबत विशेष रुपाने आदर-सत्काराचा आदेश दिला आहे.

हे प्रिय माते! आपण या जगातील जीवनात मला सुख-सुविधा पोहचविल्या, परंतु मी या जगात आपली काय बरे सेवा करु शकतो? माझी ही हार्दिक इच्छा आहे की आपणास भावी जीवनात पूर्ण सुख प्राप्त होवो आणि त्याचे प्रारंभिक कारण मी बनावे. आई! तो शांतिमार्ग ज्याच्यावर आचरण करुन पारलौकिक जीवनात चिरस्थायी सुख-सुविधा आहेत तो इस्लामच आहे. याच मार्गाचे अनुकरण करुन भौतिक संसारात सफलता आणि पारलौकिक जीवनात मोक्ष आणि प्रभुचे सामिप्य प्राप्त होऊ शकते. यासाठीच माझी ही इच्छा आहे की आपणही याच धार्मिक धारणेला स्वीकारुन त्यानुसारच जीवन व्यतीत करावे. घरी अनेक वेळा मी आपली समजूत घालण्याचा प्रयत्न केला आणि आपणास ईशआदेशाकडे येण्याचे आमंत्रणही दिले. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष केले. वास्तविक हे आपण चांगल्या प्रकारे जाणता की मला आपल्यापासून कोणताही मोबदला अपेक्षित नाही किंवा कोणताही भौतिक, सांसरिक लोभ नाही. माझी अगदी प्रामाणिक इच्छा केवळ हीच आहे की आपल्या प्रिय आईला नरकाच्या त्या भडकत्या आगीपासून वाचवावे जी मला दिसत आहे. आपण ज्या मार्गावर चालत आहात तो मार्ग आपणास त्याच मार्गाकडे घेऊन जात आहे. परंतु आपणास त्याचा गंधही नाही. अर्थात आपण एका रेल्वेवर स्वार आहात, ती गाडी ज्या मार्गावरुन जाणार आहे त्या मार्गात एक पूल असा आहे ज्याचे रूळ उखडून

पडले आहेत. मी हे चांगल्या प्रकारे जाणत आहे की ही रेल्वे मुक्कामावर पोहचण्याऐवजी रस्त्यातच उलटून जाईल आणि यामधील सर्व प्रवासी घायाळ होऊन मृत्यूमुखी पडतील. हे आई, माझ्याकडे एक सुंदर कार आहे, जी मला माझ्या मुक्कामापर्यंत सहज आणि निश्चित स्वरुपात पोहचवेल. मी वारंवार प्रत्येक स्थानकावर आपल्याकडे येतो आहे आणि आपणास हाक देऊन सांगत आहे की, "हे माझ्या आदरणीय माते! खाली उतरा या ट्रेनमधून. ही तर रस्त्यातच उलटणार आहे. या माझ्या कारमध्ये प्रवेश करुन सुखद प्रवास करा यातच कल्याण आहे." परंतु आपण सतत नकार देत आहात. मी मात्र तरीही आपणास सारखा बोलावित आहे. जर तो धोकादायक पूल येण्यापूर्वी तुम्ही आपली ट्रेन सोडून माझ्या कारमध्ये आलात तर सुखरुप मुक्कामापर्यंत पोहचाल अन्यथा पूल येताच अन्य लोकांप्रमाणे तुम्हीसुद्धा नष्ट होऊन जाल. त्या वेळेस तुम्ही म्हणाल, "कदाचित मी तुझे म्हणणे ऐकले असते आणि कारमध्ये बसले असते!" आपण जीवनाच्या ज्या गाडीवर स्वार आहात ती रस्त्यातच उलटणार आहे आणि मुक्कामापर्यंत पोहचणार नाही. याउलट जर आपण त्या गाडीत आलात ज्यामध्ये मी बसलो आहे अर्थात इस्लामची गाडी तर निश्चितपणे सकुशल आपण मुक्कामापर्यंत पोहचू.

प्रिय आई! या माझ्या त्या भावना आहेत ज्या माझ्या हृदयात प्रज्वलित होत आहेत, त्याच मी तुमच्या समक्ष प्रस्तुत करीत आहे. अल्लाह समक्ष मी प्रार्थना करतो की माझ्या या भावना आपल्या हृदयात रुजवाव्यात आणि आपणास सन्मार्गावर चालण्याची प्रेरणा द्यावी, जेणेकरुन आपणास मृत्यूपश्चात अल्लाह समक्ष उभे राहता येईल आणि ईशकृपा व दयेस आपण पात्र ठरु शकाल. आशा आहे माझ्या विचारांवर चिंतन मनन करुन उत्तर द्याल.

आपला आज्ञाकारी पुत्र

नसीम गाजी